# प्रेस नोट

मुंब्रा बायपास रेतीबंदर जवळील मुंब्रा कौसा बाहयवळण रस्त्यामधील आर.ओ.बी. पुलाची दुरूस्ती व पुलाच्या स्लॅबवर उच्चशक्ती कॉंक्रीटीकरण ओव्हरले काम पी.डब्लु.डी यांच्या मार्फत करण्यात करीता दिनांक ०५/०४/२०२३ पासून मुंब्रा बाय पास रोड बंद करण्यात आला होता. हा रस्ता बंद असताना विविध पर्यायी मार्गाने सर्व वाहनचालकांना जावे लागत होते. आज दिनांक १४.०६.२०२३ रोजी रात्री १९.०० वाजे पासून मुंब्रा बायपास रोड आर.ओ.बी. पुलाची दुरूस्ती व पुलाच्या स्लॅबवर उच्चशक्ती कॉंक्रीटीकरण ओव्हरले काम पूर्ण झाले असून रस्ता सर्व नागरिकांना वापण्याकरीता खुला करीत आहोत. हा मार्ग खुला झाल्याने जे.एन.पी. टी. येथून तसेच उत्तर भारतातून येणारी छोटी वाहने तसेच जडअवजड वाहने ठाणे शहरात न येता मुंब्रा बायपास मार्गाने मार्गस्थ झाल्याने वाहतुकी कोंडी कमी होण्यास मदत होईल.

मुंब्रा बाय पास रोड च्या कामाकरीता दिनांक २८/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेली अधिसूचना रद्द करण्यात येत असून दिनांक १०/०९/२०१८ अन्वये जडअवजड वाहनांकरीता जारी करण्यात आलेली अधिसूचना लागू असेल. (दुपारी १२:०० ते १६:०० आणि रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० प्रवेश जड-अवजड वाहनांना फक्त)